**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १४८/२०१८.</u>**

**नि. ३१ क्रमशः**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ संगिता ज्ञानेश्वर पवार यांचा पुढील सरतपास ॲड. के. एन. निंबाळकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू :-</u>**

१. मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **<u>नि.क्र.३१</u>** वर आहे. सदरील प्रकरणात मी गट क्र. २०३ चा ७/१२ उतारा दाखल केला असून तो **<u>नि.क्र. ३६</u>** वर आहे. तसेच सदरील प्रकरणात मी फेरफार नोंद क्र. ६३४ ची सत्यप्रत दाखल केली असून ती **<u>नि. क्र. ३७</u>** वर आहे. सदरील प्रकरणात मी मोटार अपघात केस क्र. १०१६/१९९६ मधील आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल केली असून ती **<u>नि.क्र. ३८</u>** वर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते २ तर्फे वकिल श्री. एस. के. कुलकर्णी यांच्यामार्फत सुरूः-</u>**

२. माझे ७ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. मी सध्या माझे माहेरी पाझंणदेव, ता. नांदगांव येथे राहते. माझा दुसरा विवाह झाला नाही. मला दावा मिळकतीची माहिती आहे. दावा मिळकतीचा सर्व्हे क्रमांक मला आठवत नाही. मला दावा मिळकतीचे क्षेत्र आठवत नाही. दावा मिळकतीच्या चतु:सिमांचे गट क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा मुळ सर्व्हे क्र. <u>४६/२</u> असा होता व सदर मिळकतीचे मुळ मालक राणु मनाजी पवार हे होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६९ मध्ये सदर मिळकतीचे वाटप होवून सदर मिळकतीचा सर्व्हे क्रमांक <u>४६/२अ</u> असा झाला व सर्व्हे क्रमांक <u>४६/२अ</u> हा काळू महादु पवार याच्या वाटणी हिश्यास गेला. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६९ मध्ये झालेल्या दावा मिळकत सर्व्हे क्रमांक <u>४६/२अ</u> म्हणजेच सध्याचा गट क्र. २०३ च्या झालेल्या वाटपानुसार फेरफार नोंद क्र. ८२४ नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नोंद क्र. ८२४ विरुध्द आजपर्यंत आम्ही कोठेही आक्षेप नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती नामे ज्ञानेश्वर पवार हयाचा अपघात होण्याच्या तीन महिन्यापुर्वी माझेत व त्याच्यात बेबनाव झाला होता व आम्ही वेगळे झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पतीच्या अपघातावेळी त्यांच्या

सोबत राहत नसल्यामुळे तो अपघात कसा झाला, कधी झाला व त्यानंतर त्यांनी कोठे उपचार घ ेतले व ते कधी मयत झाले याची मला माहिती नाही. हे मला आठवत नाही की, माझे पती ज्ञानेश्वर यांचा अपघात दि. १७/०९/१९९४ रोजी रात्री ११:०० वा. च्या सुमारास मुंबई आग्रा महामार्गावरील कांदली या गावाजवळ झाला होता. माझे पती ज्ञानेश्वर अपघातानंतर साधारणतः ०५ महिन्यांनंतर मयत झाले. माझे पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील माझे पती कोणत्या तारखेला मयत झाले या संदर्भातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पती ज्ञानेश्वर सोबत लग्नानंतर केवळ २९ दिवस नांदले व त्यामुळे त्यांचा अपघात कधी झाला याबाबत मला कोणतीही माहिती नाही. माझे पती मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटलमध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती ज्ञानेश्वर यांचा दि. १७/०९/१९९४ रोजी अपघ ात झाल्यानंतर त्यांना सर्वप्रथम प्रतिवादींनी भिवंडी येथील रुग्णालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, भिवंडी येथील रुग्णालयात १५ दिवस उपचार घेतल्यानंतर देखील त्यांच्या तब्येतीत फरक न पडल्यामुळे त्यांना जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. साक्षीदार स्वत :हून सांगते की, त्यानंतर त्यांना सायन येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले व त्यानंतर जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. भिवंडी येथील रुग्णालयातून सायन येथील रुग्णालयात किती दिवसांनी दाखल केले हे मला आठवत नाही. सायन रुग्णालयात माझे पतीला दाखल केल्यासंदर्भात माझे तोंडी कथनाव्यतिरिक्त माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे मला माहित नाही की, जे. जे. हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर माझे पती गावी मनमाड येथे आले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती ज्ञानेश्वर यांनी त्यांच्या हयातीत अपघात विमा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझया पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील मजकुर 'माझे पती ज्ञानेश्वर भास्कर पवार हे अपघातात ठाणे येथे मयत झाल्याने प्र.वादी क्र. २ हीने मयत भास्कर पवार यास कायदेशीर वारस असून नुकसान भरपाई मिळणेसाठी अपघात केस क्र. १०१६/१९९६ दाखल केला', हा मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात केस क्र. १०१६/१९९६ च्या प्रकरणाची नोटीस मला मिळाल्यानंतर मला माझे पती अपघातात मयत झाल्याबाबत माहिती मिळाली. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, मला नोटीसच मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस मिळाल्यानंतर मी अपघात केस क्र. १०१६/१९९६ या

प्रकरणात हजर झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पती ज्ञानेश्वर यांच्या सोबत राहात नसल्याची बाब अपघात केस क्र. १०१६/१९९६ मध्ये सिध्द झाल्यामुळे त्या प्रकरणात माझा क्लेम नामंजुर झाला. हे म्हणणे खरे आहे की, अपघात केस क्र. १०१६/१९९६ मधील निकाला विरुध्द मी मा.मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

४. गट क्रमांक २०३ मध्ये मी नेहमी काम करत असत. गट क्रमांक २०३ संदर्भात प्र.वादी क्र. १ व ३ यांच्यात सन २००७ मध्ये वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटपानंतर गट क्र. २०३ मधील १ हेक्टर ३ आर हे क्षेत्र प्र.वादी क्र. १ अरुण हे वहीती करीत आहेत. हे मला माहित नाही की, सदर वाटपानंतर गट क्र. २०३ मधील १ हेक्टर १२ आर हे क्षेत्र प्र.वादी क्र. ३ जगन्नाथ हे वहीती करीत आहेत. हे मला माहित नाही की, गट क्रमांक २०३ संदर्भात ज्या काही नोंदी झाल्यात त्याची मला प्रथम पासुन माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक २०३ संदर्भात प्र.वादी क्र. १ व ३ यांच्यात सन २००७ मध्ये वाटपानुसार जी फेरफार नोंद झाली त्याविरुध्द मी आज पर्यंत कुठेही आक्षेप नोंदविला नाही. हे मला माहित नाही की, प्र.वादी अरुण व जगन्नाथ यांना सन २००७ मधील वाटपानुसार जे क्षेत्र आले आहे त्यावर त्यांनी बँकचे कर्ज देखील घेतले आहे. मला माझया पतीच्या अपघात विम्याची रक्कम रुपये ७५,०००/- मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्र.वादीकडुन पैसा उकळण्याकरीता मी सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के** **श्रवणोत्तर स्विकृती**

**sd/-**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदवड.** **(पी.बी. जोशी)**

**दि. १८/०७/२०२४** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदवड.**

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १४८/२०१८.</u>

**नि. ४३ क्रमशः**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रं. २ राजाराम पुंजाराम डघळे यांचा सरतपास श्रीमती के. एन. निंबाळकर यांच्या मार्फत शपथेवर पुढे सुरु -</u>**

**०१.** मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो नि. क्रं. ४३ वर आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री. एस. के. कुलकर्णी यांच्या मार्फत सुरु -**

**०२.** माझे दुसऱ्या वर्गापर्यंत शिक्षण झाले आहे. मला लिहीता वाचता येते नाही. मी सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, आज साक्ष देण्याकरीता न्यायालयातचा साक्ष समन्स मला मिळालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने साक्ष देण्याकरीता मला चालण्यास सांगितले म्हणून मी साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, वकिलांनी पूर्वीच पुरावा शपथपत्र तयार करुन ठेवले होते व माझी त्यावर सही घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रातील मजकूर वयोमानाने मी वाचून पाहिला नाही व वकिलांनी तो मला वाचून दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या शपथपत्रात काय काय लिहूण घेतले आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मेसनखेडे येथील गट क्रं. २०३ मध्ये माझा अजिबात जाण्याचा प्रसंग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या जमीनीत कोणाचा किती क्षेत्रावर कब्जा आहे याची मला माहिती नाही. मला ज्ञानेश्वरचा अपघात कोणत्या तारखेला झाला व त्याचा मृत्यू कोणत्या तारखेला झाला त्या तारखा सांगता येणार नाही. माझा प्रतिवादींच्या घरी व मयत ज्ञानेश्वरच्या घरी कधीही जाण्याचा प्रसंग आला नाही. मी वाद गट क्रमांक २०३ चा सातबारा उतारा पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सातबारा उतारा पाहिला नाही त्यामुळे कोण किती क्षेत्राचा मालक आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, संगिता हिने सांगितले म्हणून मी सही करण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

वा. दा. कबूल केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.01.06 16:55:39 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – ०६/०१/२०२६**

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.01.06 16:56:14 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
न्या.क्र.१, चांदवड